Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837

मार्च २०२४

किंमत रु. २/-

खंड १७, अंक ३

वाईजइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड यांचे मासिक

वेल्थवाईज®

Wiseinvest®
AMFI-registered Mutual Fund Distributor

आतील बाजूस

	पान क्र.
बाजारातील अस्थिरतेला हाताळण्यासाठी तुम्ही सुसज्ज आहात का?	२
तुमच्या पोर्टफोलिओतील इक्विटी फंड्सवर कधी जवळून नजर टाकली आहे का?	२&४
निवडक फंडचा परिणाम	३
FORM IV	४

"वाईजइन्व्हेस्ट"

"वेल्थवाईज" हे वाईजइन्व्हेस्ट चे मासिक प्रकाशन आहे. वाईजइन्व्हेस्ट एक AMFI रजिस्टर्ड म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर आहे. आमचे सीईओ श्री. हेमंत रूस्तगी हे सुप्रसिध्द पर्सनल फायनान्स तज्ञ आहेत. त्यांच्याकडे म्युच्युअल फंड उद्योग क्षेत्रातला 30 वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. ते नियमितपणे मुख्य राष्ट्रीय दैनिकांतून आणि व्यापारविषयक मासिकांतून लेख लिहितात त्याचप्रमाणे गुंतवणुकीशी संबंधित दूरदर्शनवरच्या अनेक कार्यक्रमांतून पर्सनल फायनान्स तज्ञ म्हणून उपस्थित असतात. गेल्या 20 वर्षात आमच्या हजारो ग्राहकांना त्यांच्या पोर्टफोलिओचा म्युच्युअल फंडस् हा मुख्य आधार बनवलेला आहे. तुमच्या सध्याच्या तसेच नवीन गुंतवणुकीसाठी तुम्हाला सुध्दा आमच्या तज्ञ मार्गदर्शनाचा लाभ होऊ शकतो. तुम्हाला फक्त आमच्या कोणत्याही शाखेला फोन करणे अथवा information@wiseinvest.co.in या संकेतस्थळावर तुमचे तपशील ई–मेल करणे एवढेच करायचे आहे.

प्रिय गुंतवणूकदार,

फेब्रुवरी महिन्यात स्टॉक मार्केट लाभ आणि नुकसानाच्या मध्ये हेलकावे खात असल्याने सेन्सेक्स १.०४% आणि निफ्टी १.१८% वाढले. आधीच्या महिन्यात रु.२५,००० कोटी रुपयांची रक्कम काढून घेतल्यानंतर फेब्रुवारी महिन्यात परकीय गुंतवणूकदारांनी रु.५,१०७ कोटी एवढ्या रकमेच्या भारतीय इक्विटीज्ची खरेदी केली. तथापि, अलीकडील वाढीनंतर झालेल्या उच्च मूल्यांकनामुळे परकीय गुंतवणूकदार हे भारतीय बाजारपेठांच्या बाबतीत सावध भूमिका घेतील हे विचारात घेता, मार्च महिन्यात परकीय गुंतवणूक मध्यम प्रमाणात राहण्याची शक्यता आहे.

आर्थिक वर्ष२०२४च्या ऑक्टोबर-डिसेंबर ह्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेत ८.४% ने वृद्धी झाली. डिसेंबरच्या तिमहीत झालेली वृद्धी ही अर्थशास्त्रज्ञांसाठी आश्चर्याची ठरली, कारण सरकारने केलेल्या खर्चामध्ये नाममात्र घट झाल्याने, औद्योगिक उत्पादनाची मंद वृद्धी आणि असमान पावसाळी हंगाम यांमुळे आर्थिक वृद्धी आकुंचित होईल अशी अपेक्षा होती. तथापि, बांधकाम आणि वस्तुनिर्मिती क्षेत्र मजबूत राहिल्यामुळे आर्थिक वृद्धीने अनपेक्षितपणे उसळी घेतली. अर्थव्यवस्था चांगली दिसत असल्याने येणाऱ्या सार्वजनिक निवडणुकांमध्ये सरकारची स्थिती सुरक्षित होईल.

जानेवारी महिन्यात भारताच्या कोअर सेक्टरचा ३.६% ने विस्तार झाला, जी गेल्या १५ महिन्यातील सर्वात कमी गती होती. गेल्या महिन्यात कोअर सेक्टरमध्ये ४.९% आणि आधीच्या वर्षात ९.७% वृद्धी झाली होती. पायाभूत क्षेत्र (कोअर सेक्टर) महत्त्वाचे असते, कारण त्यात ८ पायाभूत क्षेत्रांचा समावेश होतो आणि उत्पादनाचा मोठा भाग यातून मिळतो. पायाभूत क्षेत्र हे आयआयपी आणि जीडीपी यांसाठी महत्त्वाचा निदर्शक असते, कारण आयआयपी बास्केटमध्ये कोअर सेक्टरचे ४०.२७% वेटेज असते.

भारताची जीएसटीची जमा झालेली ढोबळ रक्कम फेब्रुवारी २०२४मध्ये वर्षागणिक (YoY) रु.१,६८,३३७ ने वाढून १२.५ टक्के वाढली. ही वृद्धी देशांतर्गत व्यवहारांमध्ये जीएसटीमध्ये १३.९ टक्के वाढ झाल्याने आणि आयात केलेल्या वस्तूंवरील जीएसटीमध्ये ८.५ टक्के वाढ झाल्याने झाली. फेब्रुवारी २०२४मध्ये झालेल्या अलीकडे गोळा झालेल्या रकमेमुळे गोळा झालेली एकूण ढोबळ रक्कम चालू आर्थिक वर्षात रु.१८.४० कोटी एवढी आहे, जी आर्थिक वर्ष २०२२-२३च्या याच कालावधीत गोळा झालेल्या रकमेच्या ११.७ टक्के जास्त आहे.

बाजारपेठेतील अस्थिरता वाढल्यामुळे तुमच्या असेट अलोकेशनवर आणि तुमच्या इक्विटी पोर्टफोलिओच्या माध्यमातून सेग्मेंटनुसार एक्सपोजरवर लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे. बाजारपेठेतील सर्व तिन्ही सेग्मेंट्स हे तुमच्या पोर्टफोलिओमध्ये दीर्घ कालावधीमध्ये कोणत्या प्रकारचा परतावा मिळू शकतो या बाबतीत महत्त्वाची भूमिका पार पाडीत असल्याने जोखीम आणि परतावा यांच्यामध्ये समतोल साधणे महत्त्वाचे असते.

सस्नेह,

हेमंत रुस्तगी
संपादक

Address to be affixed here

If undelivered, please return to:

Wiseinvest Pvt. Ltd.
602, 6th Floor, Sri Krishna Complex,
Opposite Laxmi Industrial Estate,
New Link Road, Andheri (W),
Mumbai 400 053.
Tel : 6828 8947

फेब्रुवारी २०२४ मधील शेअर बाजारातील परिणाम

निर्देशांक	३१ जानेवारी २०२४	२९ फेब्रुवारी २०२४	बदल (%)
सेन्सेक्स	७१,७५२.११	७२,५००.३०	१.०४
मिडकॅप	३८,७७४.५०	३९,३४६.९८	१.४८
स्मॉल कॅप	४५,७२२.५८	४५,२२५.१०	-१.०९
बठ एस ई-१००	२२,५०९.१९	२२,९२१.२७	१.८३
बठ एस ई-२००	९,७६८.२०	९,९५५.३८	१.९२
बठ एस ई-५००	३१,३०३.३५	३१,७७७.०२	१.५१



बाजारातील अस्थिरतेला हाताळण्यासाठी तुम्ही सुसज्ज आहात का?

गेल्या काही महिन्यांमधील स्टॉक मार्केटची अस्थिरता गुंतवणूकदारांच्या सहनशीलतेचा आणि जिद्दीचा अंत पाहत आहे. अशा प्रकारच्या दिवसांमध्ये त्यांना काही चिंता सतावू लागतात. परिणामस्वरूपी, त्यांना एकतर त्यांच्या गुंतवणूकधोरणाविषयी शंका वाटू लागते किंवा ते एकाएकी काही निर्णय घेतात, ज्यामुळे त्यांची गुंतवणूकप्रक्रिया भरकटते.

बाजारपेठेत वेगवेगळ्या प्रवृत्तीचे गुंतवणूकदार असल्याने त्यांच्या प्रतिक्रियाही मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या असतात. उदाहरणार्थ, पडत्या बाजारपेठेत काही गुंतवणूकदारांना विक्री करणे भागच आहे असे वाटत असेल, तर काहींना ती गुंतवणूक करण्याची संधी वाटू शकते. परंतु अशा प्रकारच्या स्थितीचा सामना करण्याचा योग्य मार्ग आहे तो म्हणजे लगेच प्रतिक्रिया न देणे आणि तुमच्या लक्ष्यावर आणि कालक्षितिजावर लक्ष केंद्रित करणे. तुमच्या कालक्षितिजाशी बांधील राहिल्याने कठीण परिस्थितीचा सामना करणे अधिक सोपे होते.

स्टॉक मार्केट ज्या ज्या वेळी अस्थिर बनते त्या त्या वेळी गुंतवणूकदारांना अशा स्थितीचा सामना करावा लागतो ज्यात एरव्ही मजबूत वाटणारा पोर्टफोलिओ अगदी कमी नफा किंवा तोटाही दाखवू लागतो. गुंतवणूकदारांना हे समजण्याची गरज आहे की, बाजारपेठेतील अस्थिरतेमुळे पोर्टफोलिओच्या मूल्यांकनावर होणारा कोणताही परिणाम हा अल्पकालीन असतो. बाजारपेठेत सुधारणा होऊ लागताच पोर्टफोलिओ पुन्हा मजबूत दिसू लागतात. म्हणूनच गुंतवणूक करीत राहणेच नव्हे तर गुंतवणुकीची प्रक्रिया अखंडपणे करीत राहणेच शहाणपणाचे ठरते.

कधीकधी अस्थिरतेचे वारंवार येणारे प्रसंग गुंतवणूकदाराला बुचकळ्यात टाकीत असतात की, त्यांना त्यांच्या इक्विटी पोर्टफोलिओमधून पैसे मिळू शकतील का? स्टॉक मार्केट्सचा कल अस्थिर होण्याकडे असल्याने गुंतवणूकदारांना वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या प्रमाणात चढ-उतार अनुभवास येतात. पण हेही खरे आहे की, दीर्घ काळामध्ये स्टॉक मार्केट्स सर्वसाधारणपणे वर चढतात. म्हणूनच गुंतवणूकदारांसाठी परतावाचा सकारात्मक वास्त दर प्राप्त करण्याची क्षमता असलेला असेट क्लास म्हणून इक्विटिजना लौकिक प्राप्त झालेला आहे. एक बरे आहे की, अस्थिरतेचा फायदा तुमच्यासाठी कसा करून घ्यावा यासाठीची धोरणे अस्तित्वात आहेत. अशाच प्रकारचे एक धोरण म्हणजे आपल्या कालक्षितिजाशी बांधील राहणे आणि शिस्तबद्ध पद्धतीने गुंतवणूक करीत राहणे.

त्यानंतर पोर्टफोलिओतील फंडांपैकी काही फंड इतरांपेक्षा जास्त पडतात ही एक समस्या असते. यामुळे काही गुंतवणूकदारांना घाईघाईने कृती करण्याचा मोह होतो. वास्तवात, म्युच्युअल फंडाच्या पोर्टफोलिओमध्ये डायव्हर्सिफाईड, मिड-कॅप, स्मॉल-कॅप, स्पेशॅल्टी तसेच सेक्टर फंडांचे मिश्रण असू शकते. बाजारपेठेतील वेगवेगळे सिग्मेंट्स बाजारपेठेतील वेगवेगळ्या परिस्थितीला वेगवेगळ्या पद्धतीने प्रतिक्रिया देत असल्याने, कामगिरीवर होणारा परिणामही वेगवेगळा असतो.

उदाहरणार्थ, सर्वसाधारणपणे मिड-कॅप फंड हा घसरत्या बाजारपेठेत लार्ज कॅप फंडापेक्षा जास्त पडेल. जे गुंतवणूकदार गुंतवणूकीच्या बाबतीत पूर्वनियोजनाशिवायचा दृष्टिकोन स्वीकारतात, त्यांच्याकडे सरासरीपेक्षा जास्त पडणारे ॲग्रेसिव्ह फंड असू शकतात. उदाहरणार्थ, फक्त जे फंड ''फ्लेव्हर ऑफ द मंथ'' असतात त्यांच्यात गुंतवणूक करण्याच्या धोरणाचा अवलंब केल्याने अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून तुम्हाला जर दीर्घ काळ गुंतवणूक करणारे यशस्वी गुंतवणूकदार व्हायचे असेल, तर योग्यपणे समतोल साधलेला पोर्टफोलिओ तयार करणे अनिवार्य असते. बाजारपेठ जर पडली किंवा अस्थिर झाली, तर त्याचा कामगिरीवर काय विपरीत परिणाम होऊ शकेल हे समजून घेणे हेही तेवढेच महत्त्वाचे असते.

अनेक गुंतवणूकदारांना बऱ्याचदा असे वाटत असते की, जेव्हा ते नफा कमावतात तेव्हा बाजारपेठ वर जाणे सुरू असते आणि जेव्हा नफा मिळत नाही तेव्हा बाजारपेठ पडत असते. ह्या अशा परिस्थितीचा गुंतवणूकदारांना अनेक वेळा सामना करावा लागतो. वास्तविक, ओपण जेव्हा बाजारपेठेची योग्य वेळ गाठण्याचा प्रयत्न करीत असतो, तेव्हा हे सर्व घडत असते. हे सर्वश्रुत आहे की, खूप अनुभवी फंड मॅनेजर्सनासुद्धा बाजारपेठेची योग्य वेळ गाठण्यात सातत्य राखण्यात अडचणी येतात.

तर मग जेव्हा सामान्य गुंतवणूकदार असे करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्याला बाजारपेठ विरुद्ध दिशेने जात असल्याचे आढळून येत असेल तर आश्चर्य वाटायला नको. महत्त्वाची बाब आहे ती म्हणजे एका वर्षात मिळालेला असामान्य परतावा भविष्यातील परताव्यासाठी बेंचमार्क ठरू नये. त्याचप्रमाणे एखाद्या वाईट वर्षानंतर परिस्थिती वेगाने बदलू शकते. म्हणून कामगिरीचे मोजमाप करण्याचा मापदंड म्हणून प्रत्येक वर्षाची कामगिरी पाहण्यापेक्षा वार्षिकीकृत परतावा पाहण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

सिक्युरिटी गुंतवणुकीप्रमाणेच म्युच्युल फंड, शेअर बजार आणि इतर धोक्यांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

आमच्या सन्माननीय वाचकांसाठी सुचना

अधिकाधिक गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीतून जास्तीतजास्त परतावा मिळावा यासाठी आमच्या प्रामाणिक प्रयत्नांचा एक भाग म्हणून तुमच्यापैकी काही जणांना 'वेल्थवाईज' मोफत पाठविण्यात येत आहे. आम्हाला अशी प्रामाणिक अपेक्षा आहे की, तुम्हाला वेल्थवाईज मधला मजकूर आवडेल आणि कोणत्या ना कोणत्या मार्गाने तुम्हाला त्यापासून फायदा होईल. परंतु तुम्हाला जर नियमितपणे 'वेल्थवाईज' नको असेल, तर कृपया आम्हाला information@wiseinvest.co.in वर ईमेल पाठवून तसे कळवावे. तुम्ही आम्हाला पेज ४ वर उल्लेख केलेल्या आमच्या कॉर्पोरेट कार्यालयाच्या पत्त्यावरही लिहून कळवू शकता.

तुमच्या पोर्टफोलिओतील इक्विटी फंड्सवर कधी जवळून नजर टाकली आहे का?

तुम्ही जर इक्विटी फंडमधील विद्यमान गुंतवणूकदार असलात किंवा ते तुम्हाला पोर्टफोलिओत जोडायचे असले, तर फक्त योग्य निवड करणेच नव्हे, तर विचार करण्याची पद्धतही योग्य असणेही महत्त्वाचे आहे. कारण स्टॉक मार्केटच्या अस्थिरतेमुळे तुमच्या सहनशीलतेला आणि ठाम निर्धाराला तुम्ही निश्चित केलेल्या कालक्षितिजातच आव्हान दिले जाईल.

अनेक गुंतवणूकदार त्यांच्या पोर्टफोलिओवर स्टॉक मार्केटच्या अस्थिरतेमुळे होणाऱ्या विपरीत परिणामांशी व त्यामुळे इक्विटी फंडांमध्ये गुंतवणूक करताना निर्माण झालेल्या द्विधा मन:स्थितीशी झुंज देत असतात. त्याखेरीज, त्यांच्या पोर्टफोलिओत विशिष्ट प्रकारच्या फंडांना नेमकी जागा देतानाही त्यांना बऱ्याचदा झगडावे लागते. पर्यायाने, यामुळे फंडांच्या विशिष्ट संवर्गांना प्रमाणापेक्षा जास्त जागा दिली जाते व परिणामस्वरूपी, एकतर ते त्यांच्या गरजांशी अनुरूप नसतात किंवा परताव्याच्या बाबतीत अवास्तव अपेक्षा निर्माण करतात.

मग ह्या समस्यांचा सामना तुम्ही कसा केला पाहिजे? अल्प कालावधीमध्ये बाजारपेठेबद्दल भाकीत करणे अवघड असल्याने तुम्ही बाजारपेठेच्या दीर्घकालीन संभाव्य क्षमतेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि तुमचे संपूर्ण धोरण त्याभोवती फिरत राहिले पाहिजे. लक्षात ठेवा, बाजारपेठेची अस्थिरता कमी करण्यासाठी वेळ आणि सहनशीलता हे गुंतवणूकदारांचे उत्तम साथीदार असतात.

जोखमी आणि अपेक्षा यांचे व्यवस्थापन करण्याच्या बाबतीत गुंतवणुकीशी जोडलेल्या जोखमी आणि संभाव्य लाभ जोखण्याची गरज असते. बाजारपेठेतील चढ-उतारांच्या बाबतीत आपली जोखीम सहन करण्याची क्षमता आणि सहजतेची पातळी याविषयी आपणा सर्वांना माहीत असते आणि वेगवेगळ्या फंडांसाठी पैशांचे वाटप करताना ह्या सर्वांचा विचार पूर्ण प्रामाणिकपणे केला गेला पाहिजे. लक्षात ठेवा, बाजारपेठेतील उतार हे

Cont. on page 4...

निवडक फंडचा परिणाम

फेब्रुवारी २३, २०२४ रोजी असलेल्या नोंदी

इक्विटी फंडस्

लार्ज कॅप, लार्ज & मिडकॅप, मल्टी कॅप

Fund	Launch	6 Mth*	1 Year*	2 Year**	3 Year**	5 Year**	7 Year**	10 Year**	15 Year**
ABSL Flexi Cap Fund	Aug-98	18.33	35.61	16.60	17.07	17.17	13.69	17.82	18.48
ABSL Frontline Equity Fund	Aug-02	16.15	32.07	16.48	16.85	16.49	13.36	15.56	17.74
Axis Focused 25 Fund	Jun-12	14.45	26.98	5.22	7.18	13.25	12.77	14.82	-
Axis Growth Opportunities Fund	Oct-18	19.30	41.14	17.91	19.79	21.46	-	-	-
Bandhan Focused Equity Fund	Mar-06	19.99	40.72	16.35	15.20	15.93	13.68	13.49	13.92
Canara Robeco Flexi Cap Fund	Sep-03	16.31	30.72	13.89	16.23	18.03	16.19	16.17	18.46
HDFC Flexi Cap Fund	Jan-95	21.91	42.52	28.05	25.52	21.20	17.25	18.36	20.40
HDFC Large and Mid Cap Fund	Feb-94	22.09	49.22	27.11	25.90	22.62	17.17	15.62	16.64
HDFC Top 100 Fund	Sep-96	19.54	37.45	22.73	20.11	17.42	14.64	16.21	18.05
ICICI Prudential Bluechip Fund	May-08	22.13	39.00	20.81	20.43	19.06	15.85	16.80	19.07
ICICI Prudential Large & Mid Cap Fund	Jul-98	23.72	43.66	25.84	26.21	22.48	16.30	17.28	18.20
Invesco India Contra Fund	Apr-07	21.83	40.91	21.18	19.61	19.68	17.12	19.85	20.21
Kotak Bluechip Fund	Dec-98	16.20	29.47	15.82	16.07	17.53	14.24	15.74	15.98
Kotak Equity Opportunities Fund	Sep-04	18.38	38.60	22.33	21.03	20.75	16.34	18.65	18.85
Kotak Flexicap Fund	Sep-09	16.20	32.30	17.74	16.20	16.73	14.15	17.66	-
Kotak Multicap Fund	Sep-21	29.81	59.53	32.38	-	-	-	-	-
Mirae Asset Large & Midcap Fund	Jul-10	18.18	38.99	18.07	18.80	21.75	18.13	23.60	-
Motilal Oswal Large and Midcap Fund	Oct-19	25.66	51.87	26.61	25.00	-	-	-	-
Nippon India Large Cap Fund	Aug-07	18.85	41.62	25.19	23.28	18.83	16.29	17.88	18.04
Nippon India Multi Cap Fund	Mar-05	16.39	47.80	30.14	29.59	21.49	17.93	18.13	21.87
Parag Parikh Flexi Cap Fund	May-13	22.56	43.15	21.12	22.89	23.79	20.17	20.49	-
PGIM India Flexi Cap Fund	Mar-15	12.76	26.83	11.32	15.88	20.86	15.77	-	-
SBI Focused Equity Fund	Oct-04	9.85	29.77	10.68	14.72	17.03	15.44	17.84	22.75
SBI Large & Midcap Fund	Feb-93	16.35	35.15	21.36	21.76	20.36	16.51	18.37	19.15
UTI Flexi Cap Fund	May-92	7.61	20.60	5.53	9.09	15.37	13.72	15.18	17.24

मिडकॅप आणि स्मॉल कॅप

Axis Midcap Fund	Feb-11	16.35	36.61	17.48	18.98	21.32	19.15	20.99	-
HDFC Mid-Cap Opportunities Fund	Jun-07	23.99	57.79	34.31	30.24	25.83	18.90	22.53	24.78
Kotak Emerging Equity Fund	Mar-07	15.72	37.02	22.32	22.77	24.05	17.72	23.24	21.99
Motilal Oswal Midcap Fund	Feb-14	30.26	56.92	33.38	34.47	27.72	18.96	-	-
PGIM India Midcap Opportunities Fund	Dec-13	13.58	27.91	14.54	21.09	26.76	17.79	18.32	-
UTI Mid Cap Fund	Apr-04	14.83	39.40	19.64	21.19	22.43	15.88	20.47	22.60
HDFC Small Cap Fund	Apr-08	19.31	52.68	32.38	32.80	24.88	21.34	22.05	22.73
Kotak Small Cap Fund	Feb-05	14.12	37.64	18.90	25.25	27.91	19.00	23.15	22.63
Nippon India Small Cap Fund	Sep-10	21.88	58.41	33.59	36.87	31.56	23.84	28.26	-
SBI Small Cap Fund	Sep-09	15.06	37.35	23.36	25.36	25.86	21.24	26.88	-
Bandhan Small Cap Fund	Feb-20	33.45	71.65	31.90	30.50	-	-	-	-

सांप्रदायिक / विषयगत आणि कर बचत

UTI Flexi Cap Fund	May-92	7.61	20.60	5.53	9.09	15.37	13.72	15.18	17.24
Nippon India Banking & Financial	May-03	13.11	33.44	20.32	18.80	15.37	13.25	17.91	19.75
ICICI Prudential Pharma Healthcare	Jul-18	27.63	64.23	27.10	21.46	25.72	-	-	-
Nippon India Pharma Fund	Jun-04	24.77	61.57	25.12	21.35	24.06	18.17	17.60	23.92
SBI Healthcare Opportunities Fund	Jul-99	24.82	62.24	28.11	21.97	25.02	14.38	15.83	22.29
Kotak Pioneer Fund	Oct-19	19.20	41.66	19.85	17.62	-	-	-	-
Axis ELSS Tax Saver Fund	Dec-09	16.60	31.49	9.42	9.93	14.83	13.79	16.71	-
Bandhan ELSS Tax Saver Fund	Dec-08	16.91	38.62	20.84	22.98	21.85	17.81	18.82	19.27
Kotak ELSS Tax Saver	Nov-05	17.04	35.45	20.16	20.12	19.81	15.70	18.46	17.75
Mirae Asset ELSS Tax Saver Fund	Dec-15	16.25	34.82	16.98	17.65	20.32	17.98	-	-

हायब्रिड - आरबीट्राज

Funds	Launch	3 Mth*	6 Mth*	1 Year*	2 year**	3 Year**	5 Year**
Bandhan Arbitrage Fund	Dec-06	2.06	3.81	7.50	6.00	5.25	5.03
ICICI Prudential Equity Arbitrage Fund	Dec-06	2.04	3.82	7.48	6.05	5.38	5.18
Kotak Equity Arbitrage Fund	Sep-05	2.16	4.00	7.81	6.34	5.61	5.37

हायब्रिड

Fund	Launch	6 Mth*	1 Year*	2 Year**	3 Year**	5 Year**	7 Year**	10 Year**	15 Year**
ABSL Equity Hybrid '95 Fund	Feb-95	12.83	27.37	10.19	13.11	12.86	10.25	13.68	15.63
Canara Robeco Equity Hybrid	Feb-93	13.05	25.17	12.80	13.59	15.50	13.46	15.60	16.64
DSP Equity & Bond Fund	May-99	11.29	26.65	13.28	13.10	15.75	12.49	15.32	15.24
ICICI Prudential Equity & Debt	Nov-99	20.86	37.73	22.44	24.59	21.50	16.65	18.24	18.74
Kotak Equity Hybrid Fund	Nov-99	12.32	25.47	14.97	15.84	17.73	13.13	14.03	14.63
SBI Equity Hybrid Fund	Dec-95	11.71	24.07	11.58	12.70	14.49	12.78	14.84	15.88
ABSL Bal. Advantage Fund	Apr-00	9.86	20.81	12.29	11.45	12.43	-	-	-
Bandhan Bal. Advantage Fund	Oct-14	9.11	19.06	9.36	9.34	10.74	-	-	-
ICICI Prudential Bal. Advantage	Dec-06	12.01	21.03	13.74	12.78	13.39	-	-	-
Kotak Bal. Advantage Fund	Aug-18	9.49	18.16	11.52	10.73	12.11	-	-	-
Nippon India Bal. Advantage	Nov-04	12.92	23.03	13.75	12.52	12.17	-	-	-
Bandhan Equity Savings Fund	Jun-08	5.14	11.07	7.07	7.12	7.90	-	-	-
Kotak Equity Savings Fund	Oct-14	10.80	18.83	12.12	11.63	10.95	-	-	-

* पूर्ण मोबदला - ** वार्षिक मोबदला. योजनेची पूर्वीची कामगिरी तिच्या भविष्यातील कामगिरीची निदर्शक नाही.

फेब्रुवारी २०२४ मध्ये इक्विटी व इक्विटी ओरियंटेड फंडने घोषित केलेला निवडक फंडचा नफ्याचा हिस्सा

Scheme name	Date	Dividend declared in ₹ Per unit
ICICI Prudential Balanced Advantage Fund - Monthly	01-02-2024	0.07
ICICI Prudential Equity & Debt Fund - Monthly	01-02-2024	0.16
ICICI Prudential MNC Fund	08-02-2024	1.70
DSP Focus Fund	08-02-2024	1.70
DSP India T.I.G.E.R. Fund	08-02-2024	2.30
ICICI Prudential Banking and Financial Services Fund	08-02-2024	5.50
Axis Bluechip Fund	09-02-2024	1.60
Axis Focused 25 Fund	09-02-2024	1.75
Nippon India Consumption Fund	12-02-2024	3.00
Nippon India Vision Fund	12-02-2024	5.50
Nippon India Balanced Advantage Fund	13-02-2024	0.17
DSP ELSS Tax Saver Fund	15-02-2024	0.57
HDFC Focused 30 Fund	15-02-2024	2.25
HDFC Capital Builder Value Fund	15-02-2024	2.75
DSP Small Cap Fund	15-02-2024	4.60
Sundaram Aggressive Hybrid Fund - Monthly	16-02-2024	0.25
Invesco India Infrastructure Fund	16-02-2024	4.50
Nippon India Banking & Financial Services Fund	16-02-2024	5.50
Nippon India Power & Infra Fund	16-02-2024	5.50
DSP Midcap Fund - Regular Plan	22-02-2024	2.30
Aditya Birla Sun Life Balanced Advantage Fund	23-02-2024	0.16
Canara Robeco Equity Hybrid Fund - Monthly	23-02-2024	0.69
UTI Aggressive Hybrid Fund	23-02-2024	0.82
Canara Robeco ELSS Tax Saver Fund	23-02-2024	1.12
Nippon India Value Fund	23-02-2024	4.00
Nippon India Pharma Fund	23-02-2024	10.00
HDFC Balanced Advantage Fund	26-02-2024	0.25
Edelweiss Aggressive Hybrid Fund	27-02-2024	0.17
DSP Equity & Bond Fund	28-02-2024	0.20
DSP Healthcare Fund	29-02-2024	2.00
Nippon India Focused Equity Fund	29-02-2024	2.75
DSP Equity Opportunities Fund	29-02-2024	3.10
Nippon India Small Cap Fund	29-02-2024	8.00
Nippon India Growth Fund	29-02-2024	10.00

तुमच्या पोर्टफोलियोमध्ये या यादीत असणाऱ्या तुमच्या फंडसाठी तुम्हाला डिव्हिडन्ड (नफ्याचा हिस्सा) मिळाला आहे का ते बघा. जर तुमच्याकडे कोणतीही पोर्टफोलिओ नोंद नसेल तर वाईजइन्व्हेस्ट तुमच्यासाठी ते कोणत्याही मोबदल्याशिवाय करुन देतील. एकदा आमच्याकडे तपशिल आला की आम्ही तुम्हाला दर महिन्याला नोंदी पाठवू. या मोफत सेवेचा लाभ घेण्यासाठी आमच्या मुख्य कार्यालयाशी किंवा इतर कोणत्याही शाखेशी संपर्क साधा.

सिक्युरिटी गुंतवणुकीप्रमाणेच म्युच्युअल फंड, शेअर बाजार आणि इतर धोक्यांवर अवलंबून असते. कॅपिटलमार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर आणि प्रभावांवर एन ए व्हि (NAV) चे वर किंवा खाली जाणे अवलंबून असते.

Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837
Date of publication: 8th of every month.

तुमच्या पोर्टफोलिओतील इक्विटी फंड्सवर कधी जवळून नजर टाकली आहे का?...

...Cont. from page 2

अत्यंत तीव्र आणि जलद असू शकले तरी चढावही जलद असू शकतात. म्हणून गुंतवणूक करीत राहणे आणि इक्विटी मार्केटच्या खऱ्या संभाव्य क्षमतेचा लाभ घेणे हे महत्त्वाचे असते.

या निवडप्रक्रियेच्या दरम्यान, ज्या फंडांचे व्यवस्थापन नीटपणे केले जात आहे आणि ज्यांचा ट्रॅक रेकॉर्ड सातत्यपूर्ण असेल, त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. पोर्टफोलियोत योग्य फंडांचे मिश्रण असल्यास हवे असलेले परिणाम साध्य करता येतात. तुमच्या पोर्टफोलिओमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या फंडांच्या काही संवर्गांची नावे येथे देत आहोत:

फ्लेक्सी-कॅप फंड्स

हे फंड त्यांच्या एकूण कॉर्पसपैकी ६५% इक्विटिज्मध्ये गुंतवतात. फंड मॅनेजरकडे कोणत्याही बंधनांशिवाय लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप सिग्मेंट्समध्ये जाण्याची लवचीकता असते. वेगवेगळ्या सिग्मेंट्ससाठीचे अलोकेशन हे संभाव्य वृद्ध, इतिहासातील कामगिरी आणि ह्या कंपन्या आणि क्षेत्रे यांच्याशी जोडलेल्या जोखमी यांवर अवलंबून असते. हे स्पष्ट आहे की, फ्लेक्सी कॅप फंड्सकडे बाजारपेठेतील सर्व भांडवलांकडे जाण्याचे आणि प्रत्येक मार्केट कॅप सिग्मेंटमध्ये उपलब्ध असलेल्या संधींचा लाभ घेण्याचे स्वातंत्र्य असते.

लार्ज आणि मिड-कॅप फंड्स

लार्ज आणि मिड-कॅप फंड्स मोठ्या आणि मध्यम आकाराचे भांडवल असलल्या कंपन्यांच्या स्टॉकमध्ये गुंतवणूक करतात. ह्या फंडांना त्यांच्या प्रत्येक एकूण असेटपैकी किमान ३५% लार्ज आणि मिड-कॅप कंपन्यांच्या इक्विटीमध्ये आणि इक्विटीशी संबंधित इन्स्ट्रुमेंट्समध्ये गुंतवावे लागतात. सोप्या शब्दात सांगायचे झाले तर ह्या फंडांचे गुंतवणूकविश्व हे भारतीय मार्केट्समध्ये लिस्ट करण्यात अलेल्या सर्वात मोठे २५० स्टॉक्स हे असते. फंड लार्ज कॅप स्टॉककडे झुकलेला आहे की मिड-कॅप स्टॉककडे हे ठरविण्यासाठ तुम्ही होल्डिंगजकडे बारीक नजर ठेवली पाहिजे. यामुळे तुमच्या जोखमीच्या प्रोफाईलनुसार फंड निवडण्यास तुम्हाला मदत होईल.

मल्टी-कॅप फंड्स

मल्टी-कॅप फंड्सना त्यांच्या असेट्सपैकी ७५% असेट्स सदैव इक्विटी किंवा इक्विटीशी संबंधित इन्स्ट्रुमेंट्समध्ये गुंतवावे लागतात. पोर्टफोलिओने त्याचे किमान २५% असेट्स लार्ज-कॅप स्टॉक्समध्ये, २५% मिड-कॅप स्टॉक्समध्ये आणि आणखी २५% स्मॉल-कॅप स्टॉक्समध्ये गुंतवावेच लागतात. मल्टी-कॅप फंडमुळे बाजारपेठेतील सर्व सिग्मेंट्समध्ये सदैव डायव्हर्सिफिकेशन मिळण्याची खात्री असली, तरी अल्प कालावधीमध्ये त्यात जोखीमही असते, कारण त्यात किमान ५०% एक्सपोजर हा स्मॉल आणि मिड-कॅप स्टॉक्सशी असतो. फ्लेक्झिकॅप फंड्समुळे फंड मॅनेजरला बाजारपेठेतील सर्व कॅप्सकडे पैसे फिरविण्यासाठी अधिक लवचीकता प्राप्त होते हे विचारात घेता ते मल्टी-कॅप फंडांपेक्षा अधिक चांगले असू शकतात.

हे फंड जर तुमच्या पोर्टफोलिओमध्ये असतील, तर तुमच्या प्रोफाईलशी असलेल्या त्यांच्या योग्यतेचे विश्लेषण करा आणि उत्तम परिणाम प्राप्त करण्यासाठी तुमच्याकडे ते योग्य त्या प्रमाणानुसार असतील ह्याची काळजी घ्या.

सिक्युरिटी गुंतवणुकीप्रमाणेच म्युच्युल फंड, शेअर बजार आणि इतर धोक्यांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

FORM IV

(See rule 8)

Statement about ownership and other particulars about newspaper entitled "WEALTHWISE" as required to be published in the first issue every year after the last day of February.

1.	**Place of publication**	:	Wiseinvest Private Limited 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Industrial Estate, New Link Rd., Andheri West, Mumbai 400053.
2.	**Periodicity of its publication**	:	Monthly
3.	**Printer's Name** **Nationality** **Address**	: : :	Hemant Kumar Rustagi Indian Wiseinvest Private Limited 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Industrial Estate, New Link Rd., Andheri West, Mumbai 400053.
4.	**Publisher's Name** **Nationality** **Address**	: : :	Hemant Kumar Rustagi Indian Wiseinvest Private Limited 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Industrial Estate, New Link Rd., Andheri West, Mumbai 400053.
5.	**Editor's Name** **Nationality** **Address**	: : :	Hemant Kumar Rustagi Indian Wiseinvest Private Limited 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Industrial Estate, New Link Rd., Andheri West, Mumbai 400053.

SHAREHOLDERS

6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total paid up capital as on 29.02.2024.

Hemant Kumar Rustagi	:	1205, Brighton Tower, 2nd Cross lane, Lokhandwala Complex, Andheri West, Mumbai 400053.
Shantasree Rustagi	:	1205, Brighton Tower, 2nd Cross lane, Lokhandwala Complex, Andheri West, Mumbai 400053.

I, Hemant Kumar Rustagi, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date: 01.03.2024

Sd/-
Hemant Kumar Rustagi
Signature of Publisher

वाईजइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड

(CIN No.: U74140MH2003PTC142921)

मुख्य कार्यालय

अंधेरी : ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०० ०५३. **टेलिफोन :** ६८२८ ८९४७.

इ-मेल : information@wiseinvest.co.in

शाखा

ठाणे : ५०२, पाचवा मजला, प्रतीभा बिल्डींग, तीन पेट्रोल पंप जवळ, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) – ४०० ६०२. **टेलिफोन :** २५३७ १५६७ / २५३९ १३०६.

इ-मेल : information1@wiseinvest.co.in

www.wiseinvest.co.in

जाहीर निवेदन : प्रकाशनाच्या वेळी यातील सर्व माहिती चुकीची व खोटी नाही याची खात्री केलेली असून, त्याच्या अचूकतेबद्दल व पूर्णत्वाबद्दल आम्ही कोणतेही प्रतिनिधत्व करत नाही. वाईजइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड ला जबाबदार न धरता सर्व माहिती पुरविण्यात आलेली आहे.

धोके : म्युच्युअल फंड, जसे की सिक्युरिटी इन्व्हेस्टमेन्ट हे शेअर बाजार व इतर धोक्यांवर अवलंबून असतात आणि योजनेची उद्दिष्टे साध्य होतीलच असे खात्रीलायक सांगता येत नाही. सिक्युरिटीजमधील इतर गुंतवणुकीप्रमाणेच युनिटचे एन ए व्हि (NAV) वर किंवा खाली जाऊ शकते व ते कॅपिटल मार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर व प्रभावांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

श्री. हेमन्त कुमार रुस्तगी यांनी ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३ येथून, वाईजइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासाठी संपादित, प्रकाशित केले आहे व ॲडव्हान्टएज ऑफसेट प्रिंटर्स, के-७ रिजवी पार्क, एस. व्ही. रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००५४ येथे छापले आहे.

Edited, Published and Printed by Mr. Hemant Kumar Rustagi, on behalf of **Wiseinvest Pvt. Ltd.** (formerly known as **Wiseinvest Advisors Pvt. Ltd.**) from 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Ind. Estate, New Link Road, Andheri West, Mumbai 400053 at **AdvantEdge Offset Printers,** K-7 Rizvi Park, S V Road , Santacruz (W), Mumbai 400 054. Design by **Mosaic Design.** Copyright reserved © 2007. All rights reserved in favour of Wiseinvest Pvt. Ltd.